साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.LSB/BEED/RNP-265 / 2026-2028

✻ परळी वैजनाथ ✻ सोमवार, दि. ०२ फेब्रुवारी २०२६ ✻ पाने-४ ✻ २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

संपादकीय...

## जिल्ह्याच्या विकासाचे स्वप्न पूर्ण व्हावे..!

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी आपली कर्मभूमी असलेल्या पुणे जिल्ह्यातील बारामती येथे येत असताना गेल्या बुधवारी म्हणजे २८ जानेवारीला सकाळी पावणे नऊच्या सुमारास विमानात झालेला तांत्रिक बिघाड व धुक्यामुळे झालेल्या अपघातात आपल्या महाराष्ट्राचे लाडके व धडाडीचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अपघाती निधन झाले. या अपघातात वैमानिकांसह अन्य दोन महिला कर्मचारी व दादांचा अंगरक्षक विदीप जाधव यांचा मृत्यू झाला. दादांचे अपघाती निधन व या विमान अपघाताची महाराष्ट्रातच नव्हे तर देशभर चर्चा झाली. राज्याच्या राजकारणातील तगडा नेता आपण गमावला. यामुळे सबंध महाराष्ट्रासह देश हळहळला. बारामतीकरांना तर तीव्र दुःख झाले. दादांच्या बाबतीत असे अघटीत होईल, असे कुणालाच वाटत नव्हते. पण नियतीच्या मनात काय आहे, हे कोणी सांगू शकत नाही.

'दादा' या शब्दाला वेगळी धार व विश्वास मिळवून देणारे 'दादा' या आपल्या आत्मीय संबोधनाने लोकप्रिय असलेले अजित आशा अनंतराव पवार यांचा जन्म त्यांच्या आजोळी म्हणजे अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथे २२ जुलै १९५९ रोजी झाला. तिथेच त्यांचे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण झाले. वडिलांच्या अकाली निधनाने तरुण वयातच त्यांच्या खांद्यावर कुटुंबाची जबाबदारी पडली. वडील अनंतराव पवार हे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे थोरले बंधू होते. कार्यतत्पर व अभ्यासू नेते असलेल्या अजितदादांनी आपले काका शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राजकारणात प्रवेश केला. १९८२ मध्ये सर्वप्रथम ते सहकारी साखर कारखान्यावर संचालक म्हणून निवडून आले आणि खऱ्या अर्थाने दादाच्या राजकारणाचा येथूनच श्रीगणेशा झाला. पुढे १९९१ ला बारामती लोकसभेच्या निवडणुकीत ते पहिल्यांदाच खासदार म्हणून दहाव्या लोकसभेवर निवडून गेले. पुढे खासदारकीचा राजीनामा देऊन ते बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीत निवडून आले आणि राज्याच्या राजकारणात रमले. १९९१, ९५, ९९, २००४, २००९, २०१४, २०१९ व २०२४ असे सलग आठ वेळा बारामतीतून विधानसभेवर विक्रमी मताधिक्याने निवडून जाण्याचा अजितदादांनी विक्रम केला. दादांनी राज्यमंत्री, कॅबिनेटमंत्री व उपमुख्यमंत्री म्हणून विविध मंत्रीमंडळात जबाबदारी सांभाळली. ते सहा वेळा राज्याचे उपमुख्यमंत्री झाले. (उर्वरित पान २ वर)

# राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्राताई पवार यांनी घेतली शपथ



मुंबई (बातमीदार):- अजित पवार यांच्या निधनाने रिक्त झालेल्या उपमुख्यमंत्रीपदी दादांच्या उत्तराधिकारी म्हणून त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा शपथविधी शनिवारी (ता.३१) मुंबईत लोकभवनात साध्या पद्धतीने पार पडला.

राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्राताईंना उपमुख्यमंत्री पदाची व गोपनियतेची शपथ दिली. साध्या पद्धतीने झालेल्या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह त्यांच्या मंत्रिमंडळातील प्रमुख मंत्री, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार, नेते, मंत्री, इतर पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. अजित पवार यांचे पुत्र जय पवार व त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यही यावेळी उपस्थित होते. शनिवारी दुपारीच सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतेपदी निवड झाली. या निवडीची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्यांच्या वर्षा निवासस्थानी जावून देण्यात आली.

यावेळी राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, आ.धनंजय मुंडे, संजय बनसोडे, समीर भुजबळ आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी याबाबत राज्यपालांना अवगत केले. त्यानंतर सायंकाळी पाचच्या सुमारास लोकभवन येथे सुनेत्राताईंचा शपथविधी पार पडला. दरम्यान, राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेताना मन अत्यंत भावूक झाले आहे, ही जबाबदारी स्वीकारताना मन अक्षरशः भरून येत आहे, आदरणीय दादांनी आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि समाजातील वंचित घटकांसाठी जगण्याचा मंत्र दिला. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेताना शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांवर निष्ठा ठेवून कर्तव्यभावनेने ही जबाबदारी स्वीकारत असल्याची ही भावना सुनेत्रा पवार यांनी शपथविधीनंतर व्यक्त केली. दरम्यान, नव्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे उत्पादन शुल्क, क्रीडा, युवा कल्याण, अल्पसंख्यांक विकास, औकाफ या खात्याचा कार्यभार देण्यात आला आहे. ✻✻✻✻

# लेक मराठवाड्याची ...



उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या उत्तराधिकारी म्हणून त्यांच्या पत्नी सुनेत्राताई पवार यांची राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी निवड झाली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या म्हणूनही त्यांची निवड करण्यात आली. राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री होण्याचा मान त्यांना मिळाला. याशिवाय मराठवाड्याच्या त्या तिसऱ्या उपमुख्यमंत्री आहेत.

सुनेत्राताई या मराठवाड्याच्या मातीत जन्मलेल्या. त्यांचे बालपण, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण याच मातीत झाले. महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी संभाजीनगरच्या सरस्वती भुवन येथे पूर्ण केले. आताच्या धाराशिव व पूर्वीच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील संत गोरोबा काका यांच्या वास्तव्याने पावन झालेल्या भूमीत म्हणजे तेर येथे १८ ऑक्टोबर १९६३ रोजी त्यांचा जन्म झाला. आई द्रौपदीबाई व वडील बाजीराव पाटील यांची ती कन्या. माजीमंत्री व ज्येष्ठ नेते पद्मसिंह पाटील यांच्या त्या भगिनी. वडील स्वातंत्र्यसैनिक व जिल्ह्याच्या राजकारणातील ज्येष्ठ नेते होते. त्यामुळे कुटुंबातूनच त्यांना राजकारणाचे धडे मिळाले होते. पद्मसिंह पाटील राज्याच्या राजकारणात सक्रिय होते. शिवाय अनेक वेळा ते मंत्री होते. जेष्ठ नेते शरद पवार व श्री पाटील यांची मैत्री होती. या मैत्रीच्या धाग्यातूनच अजितदादा व सुनेत्राताई यांचा १९८५ साली विवाह झाला.

बारामती जवळील काटेवाडी हे दादांचे मुळगाव. सासरी आल्यानंतर सुनेत्राताई शेतीत रमल्या. ताईंचे सासरही राजकीय वारसा लाभलेले. त्यामुळे राजकारणाशी त्यांचा निकटचा संबंध येत गेला. पुढे पवार कुटुंबीयांच्या विद्या प्रतिष्ठानच्या त्या विश्वस्त झाल्या. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या सदस्या झाल्या. पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या सिनेट सदस्या म्हणून त्यांची निवड झाली. बारामती हायटेक टेक्सटाईल्स पार्क, एन्हायर्नमेंटल फोरम ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट ॲग्री ॲण्ड रूरल टूरिझम फेडरेशनच्या या संस्थेचे अध्यक्षपद तसेच बारामती क्लब, कै.रघुनाथ बोरावके चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेच्या त्या विश्वस्त आहेत. पार्थ व जय ही त्यांची मुले आहेत.

विविध जबाबदाऱ्या सांभाळत त्यांनी आपल्या सासरलाही म्हणजे काटेवाडीला विकासाच्या मार्गावर घेऊन जाण्याचा संकल्प केला. काटेवाडी गावाच्या कृषी, आरोग्य, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकासात त्यांनी मोठे योगदान दिले. सुनेत्राताईंनी काटेवाडीला यशवंतग्राम, निर्मलग्राम, विमाग्राम, तंटामुक्तग्राम, देशातील पहिले सायबरग्राम व पर्यावरणग्राम म्हणून नावलौकिक मिळवून दिला. ग्राम विकासाच्या माध्यमातून काटेवाडी गाव आदर्श बनवले. काटेवाडी ग्रामपंचायतीसह गावातील अंगणवाडी, शाळा 'आयएसओ' नामांकन प्राप्त केली. यामुळेच गावातील दोन महिला सरपंचांना आदर्श सरपंचाचा राष्ट्रीय पुरस्कार तसेच गावातील शाळेतील अनेक शिक्षकांना राष्ट्रपतींच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार देवून गौरविण्यात आले. गावाच्या शैक्षणिक विकासासाठी 'शाळा प्रवेश उत्सव' ही संकल्पना सुनेत्राताईंनी प्रथमच राबवली. पुढे राज्य सरकारचा अधिकृतपणे हा शैक्षणिक उपक्रम झाला. काटेवाडी स्वच्छ करण्याच्या हाती (उर्वरित पान ४ वर)

# वसुंधरा महाविद्यालयाच्या खुले लोककला महोत्सवाने अनेक कलावंत घडवले-बाबासाहेब देशमुख




घाटनांदुर (बातमीदार):- येथील वसुंधरा महाविद्यालयात स्नेहसंमेलन व रौप्य महोत्सव समारंभानिमित्त आयोजित स्व. अशोकराव देशमुख खुले लोककला महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी वैद्यनाथ देऊळ कमिटीचे सचिव बाबासाहेब देशमुख बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष कामधेनू सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब देशमुख होते तर उद्घाटक वैद्यनाथ देऊळ कमिटीचे सचिव बाबासाहेब देशमुख,प्रमुख पाहुणे पत्रकार परमेश्वर वैद्य, श्रीकृष्ण कुसळे, साहित्यकार दत्ता वालेकर होते. यावेळी मंचावर प्रभारी प्राचार्य डॉ.अर्जुन मोरे, चंद्रकांत गायकवाड, कार्यालयीन अधीक्षक उमेश सरनाईक, प्रा. डॉ. संजय खाडप,प्रा. डॉ.मकरंद जोगदंड उपस्थित होते. यापुढे देशमुख म्हणाले की, वसुंधरा महाविद्यालय प्रति वर्ष स्व. अशोकराव देशमुख खुले लोककला महोत्सव घेऊन घाटनांदुर व परिसरातील शाळा महाविद्यालय व कलावंतांना कला सादर करण्यासाठी मंच उपलब्ध केल्याबद्दल महाविद्यालयाचे कौतुकच तसेच आपले सर्व उपक्रम स्तुत्य आहेत या महोत्सवमुळे वसुंधरा महाविद्यालयाने श्रीकृष्ण कुसळे अविनाश भारती सारखे कलावंत घडविण्याचे कार्य केले आहे असे सुतोवाच केले. तर अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. अर्जुन मोरे यांनी महाविद्यालयाच्या स्थापनेपासून आतापर्यंतचा इतिहास सांगून महाविद्यालयाचे रौप्य महोत्सवी नवीन उपक्रमाची माहिती सांगितली. या खुले लोककला महोत्सवात घाटनांदुर व परिसरातील ४२ संघाने सहभाग घेतला होता. त्यामध्ये भरतनाट्यम, पोवाडा, लावणी, निसर्गावर प्रेम व्यक्त करणारे नृत्य गीत, वारकरी नृत्य ,आदिवासी नृत्य, धनगर नृत्य आदि कला प्रकारांचे सादरीकरण उत्साहात सादर करण्यात आले. या खुले लोककला महोत्सव मध्ये लहान गटात प्रथम सृजन प्राथमिक विद्यालय चेनई द्वितीय यशवंतराव चव्हाण विद्यालय पट्टीवडगाव तृतीय तुकाराम पाटील प्राथमिक विद्यालय गिरवली तर उत्तेजनार्थ ऋत्वि रोशन परदेशी, राखी गोविंद शिंदे, शारदा इंग्लिश स्कूल घाटनांदुर, विद्या मिसाळ, मोठ्या गटात प्रथम स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर अंबाजोगाई, द्वितीय जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पुस तृतीय श्री शंकर विद्यालय घाटनांदुर तर उत्तेजनार्थ प्रज्ञा देविदास शेरखाने उजनी, विश्वजीत वाघमारे, श्री लक्ष्मीश्वर विद्यालय घाटनांदुर, आदर्श विद्यालय, घाटनांदुर या सर्व पारितोषक प्राप्त संघाला व कलावंतांना महाविद्यालयाच्या २७ जानेवारीच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात बक्षीस देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या लोककला महोत्सवाचे परीक्षण प्रा. गजानन सुवर्णकार ,प्रा. आनंत कांबळे व प्रा. डॉ.अक्षय सायकर यांनी केले आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. संजय खाडप यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. मकरंद जोगदंड यांनी मांनले या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, कलावंत व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ***

# जनतेच्या सुरक्षेला प्राधान्य..!

## ॲड.मनोज संकाये यांच्या मागणीची राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने घेतली दखल



परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी शहरातील महत्त्वाच्या वाहतूक मार्गांवर सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या मागणीला अखेर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने लक्ष दिले असून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाण पुलावरील कठडे तसेच चेंबरी रेस्ट हाऊसजवळील रेलिंग बसवण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे तसेच दोन वेळा झाडांचे अतिक्रमण काढण्याच्या कामासाठी सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या मागणीला यश आले असून प्राधिकरणाने त्यांच्या मागणीची दखल घेतली आहे. सुमारे चार महिन्यांपूर्वी ॲड. संकाये यांनी परळीचे उपजिल्हाधिकारी तसेच बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन देत या धोकादायक ठिकाणी वाहनांचे अपघात घडत असल्याने तातडीने सुरक्षाविषयक उपाययोजना करण्याची मागणी केली होती. यानंतर त्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी सतत संपर्क ठेवून कामाची प्रगती जाणून घेतली. त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांकडून कामासाठी निविदा (टेंडर) प्रक्रिया सुरू असल्याची माहिती देण्यात येत होती.

दरम्यान, परळी बीड महामार्गावरील चेंबरी रेस्ट हाऊस परिसरात रेलिंग बसवण्याचे काम पूर्ण झाले असले तरी हे काम दर्जेदार नसल्याची बाब पुढे आली आहे. त्यामुळे हे काम तात्पुरत्या स्वरूपात न ठेवता मजबूत आणि स्थायी स्वरूपात करण्यात यावे, अशी मागणी ॲड. मनोज संकाये यांनी पुन्हा एकदा केली आहे. ही कामे नागरिकांच्या सुरक्षेशी थेट संबंधित आहेत. त्यामुळे केवळ काम पूर्ण झाले एवढ्यावर न थांबता ते टिकाऊ आणि दर्जेदार असणे आवश्यक आहे, असे मत ॲड. संकाये यांनी व्यक्त केले. ***

# शोकसभेतून परळीकरांनी जागवल्या दादांच्या आठवणी

## परळीत सर्वपक्षीयांच्या वतीने अजितदादा पवार यांना श्रद्धांजली




परळी वैजनाथ, (बातमीदार):- राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. महाराष्ट्रात सर्वत्र शोकसभांचे आयोजन करून अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली जात आहे. या पार्श्वभूमीवर परळीतही शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेत तमाम परळीकरांच्या वतीने सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी अजितदादांच्या कर्तुत्वाचा उजाळा घेत दादांच्या आठवणी जागवल्या.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर येथे दिवंगत अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोक सभेला सर्वपक्षीय पदाधिकारी व सर्व स्तरातील नागरिक सहभागी झाले होते. अजितदादा पवार यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख प्रत्येकाने आपल्या शोक भावनेतून व्यक्त केला. या शोकसभेत माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी शोक प्रस्ताव मांडला. आपल्या शोक भावना व्यक्त करताना अजितदादा पवार यांच्याशी आलेला संबंध व परळीच्या विकासाच्या दृष्टिकोनातून अजितदादा पवार यांचे योगदान याविषयीची भावना त्यांनी व्यक्त केली. त्याचबरोबर व्यक्तिगत पातळीवर अजितदादा हे नेतृत्व किती आत्मीय आणि शिस्तबद्ध नेतृत्व होते याच्या दुर्मिळ आठवणीही बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी यावेळी सांगितल्या. सर्वपक्षीय पदाधिकारी कार्यकर्त्यांनी यावेळी आपापली मनोगते व्यक्त करून दिवंगत अजितदादा पवार यांच्या विषयीच्या शोक भावना व्यक्त केल्या.

यावेळी परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह शिवसेनेचे राज्य समन्वयक ज्येष्ठ नेते फुलचंद कराड, ज्येष्ठ नेते पी. एस. घाडगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब देशमुख, बाजार समितीचे सभापती सूर्यभान मुंडे , माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर रिपाईचे ज्येष्ठ नेते भास्करनाना रोडे, भाजपा ज्येष्ठ नेते शांतीलाल जैन,ज्येष्ठ नेते प्रा.दासू वाघमारे, काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुरभाई, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबा शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, शहराध्यक्ष आयुब खान पठाण, तुळशीराम पवार, राजा खान पठाण, नगरसेवक पवन मुंडे, दीपक मुंडे राजा पांडे, भीमा डावरे, महेंद्र रोडे, नितीन रोडे, शकील कुरेशी, अजित कच्छी, अनंत इंगळे, योगेश मेनकुदळे, भाजपा नेते महादेव इटके, अरुण पाठक सुशील हरंगुळे रमेश पवार, जयराज देशमुख, जालिंदर नाईकवाडे आश्विन मोगरकर, सुरेश टाक, राजेंद्र सोनी, दत्ता सावंत संजय फड, ज्येष्ठ नेते डी.जी. मस्के, के.डी.उपाडे, ॲड.दत्तात्रय आंधळे, ज्ञानोबा माऊली आघाव, व्यापारी बंडू गरुड, ओमप्रकाश सारडा, प्रा. एम एल देशमुख, उत्तम माने, रवी मुळे, रवींद्र परदेशी दिनेश गजमल, गिरीश भोसले, तुकाराम धोत्रे ,अजयकुमार गंडले, रवी आघाव, पवन फुटके धम्मा अवचारे, बापू गायकवाड, बंटी सातपुते, शरद चव्हाण, किरण सावजी सचिन मराठे, सुरेश नानवटे, अन्नपूर्णा ताई जाधव, विजयाताई दहिवाळ आदिंसह परळी शहरातील विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध संस्थांचे पदाधिकारी, संघटनांचे पदाधिकारी, व्यापारी, पत्रकार, प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. **

सा.परळी परिसर चे
वार्षिक वर्गणीदार व्हा!
-० अंकासाठी संपर्क ०-
मो.९४२२३२८४९३

# महाराष्ट्राने एक कुशल प्रशासक व अर्थमंत्री गमावला-विनोद सामत

परळी-वैजनाथ, (बातमीदार):- महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालक मंत्री मा.ना.कै.अजितदादा पवार यांचे दि.२८ जानेवारी २०२६ रोजी अपघाती दुख:द निधन झाले आहे.

मराठवाड्यातील अग्रगण्य असलेली दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप.बँक लि.,परळी वै. च्या मा. संचालक मंडळाची सभा नुकतीच दि. ३१.०१.२०२६ रोजी बँकेच्या मुख्य कार्यालयात संपन्न झाली. यावेळी मा.ना. कै.अजितदादा पवार यांच्या पावन स्मृतीस मा.चेअरमन, मा.व्हाईस चेअरमन, मा. संचालक मंडळ सदस्य व अधिकारी, कर्मचारी यांचेवतीने दोन मिनीटे शांतता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्याच्या विकासासाठी अहोरात्र कार्यतत्पर असणारे, विकासाची दुरदृष्टी ठेवणारे एक कार्यक्षम नेतृत्वाला महाराष्ट्र पोरका झाला असून मा.ना.अजितदादा पवार यांच्या जाण्यामुळे पवार कुंटूंबावर कोसळलेल्या या दुखा:तुन सावरण्याची शक्ती मिळावी, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली. यावेळी बँकेचे चेअरमन मा.श्री विनोदजी सामत, व्हाईस चेअरमन मा.श्री रमेशराव कराड, संचालक मा.श्री प्रकाशराव जोशी, मा.डॉ.श्री राजाराम मुंडे, मा.श्री महेश्वर आप्पा निर्मळे, मा.श्री विजयजी वाकेकर, मा.श्री अमोलजी डुबे, मा.श्री कुलभुषणजी जैन, मा.श्री मनमोहनजी कलंत्री, मा.श्री सुशांतजी लोमटे, मा.प्रा.डॉ.श्री विनोदजी जगतकर,मा.श्री अमरजी देशपांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विनोदजी खर्च, सरव्यवस्थापक श्री संजयजी खंदाडे व कर्मचारी उपस्थित होते. ***

(पान १ वरुन)........................ **लेक मराठवाड्याची..**

घेतलेल्या मोहिमेत त्यांनी उघड्यावरील स्वच्छापासून गावाला मुक्ती मिळवून दिली. यातूनच प्रेरणा घेऊन राज्य सरकारच्या 'गुडमॉर्निंग' पथकाची निर्मिती झाली. काटेवाडी गावातील महिलांना ग्रामपंचायतीच्या दप्तरी घराची मालकी तसेच घराच्या दारावर कुटुंब प्रमुख म्हणून महिलांच्या नावाची पाटी लावण्याचा हा उपक्रम त्यांचाच. ग्रामस्थांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळावे म्हणून पेयजल फिल्टर संच गावात त्यांनी उभा केला. गावात भूमिगत गटार योजना कार्यान्वित करून गाव स्वच्छ केले. गावात महा ई-सेवा केंद्राचा प्रथमच शुभारंभ त्यांनी केला. जनधन योजना येण्याच्या अगोदर कितीतरी वर्षांपूर्वी काटेवाडी येथे बँकांशी करार करून शून्य बॅलन्सवर ग्रामस्थांची बँक खाते उघडण्याचा उपक्रमही सुनेत्राताईंनी काटेवाडीत राबवला. गेल्या लोकसभेची प्रथमच निवडणूक बारामतीतून सुनेत्राताईंनी लढवली. परंतु या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. पुढे त्यांची राज्यसभेवर निवड झाली. राज्यसभेच्या खासदार म्हणून काम करत असताना संसदेत सुनेत्राताईंनी अनेक प्रश्न व विषय मांडले. तालिका अध्यक्षपदाची जबाबदारीही पार पाडली. संसदेच्या विविध समित्यावरही काम केले. आपल्या कार्यकर्तृत्वातून सुनेत्राताईंनी विकासाचा मापदंड निर्माण केला आहे. आदर्श उभा केला आहे. दादांच्या जाण्याने मनावर दुख:चा डोंगर असताना सुनेत्राताईंनी कर्तव्य भावनेने उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारली. दादांनी पाहिलेले महाराष्ट्राच्या विकासाचे स्वप्न ताईंना पूर्ण करावयाचे आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्री म्हणून आपल्या माहेरला म्हणजे मराठवाड्याला विकासाबाबत त्या झुकते माप देतील, ही आशा!

**– लक्ष्मण वाकडे,** ज्येष्ठ पत्रकार, परळी वै.

(पान १ वरुन)...

## जिल्ह्याच्या विकासाचे स्वप्न पूर्ण व्हावे..!

हाही त्यांचा विक्रमच. त्यांनी फलोत्पादन, ऊर्जा, जलसंधारण, जलसंपदा, ग्रामीण विकास, वित्त व नियोजन अशा विविध खात्याचा कार्यभार आपल्या मंत्रिपदाच्या कारकिर्दीत सांभाळला. १९९१ साली सर्वप्रथम तत्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात कृषी आणि फलोत्पादन राज्यमंत्री म्हणून काम पाहत असताना दादांनी आपल्या कर्तृत्वाची व नेतृत्वाची छाप सबंध राज्याला दाखवली. पुढे विलासराव देशमुख, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे व आता देवेंद्र फडवणीस यांच्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री म्हणून दादांनी जबाबदारी सांभाळली व महत्त्वाच्या खात्याचा कारभारही सांभाळा. तब्बल अकरा वेळा विधिमंडळात त्यांनी राज्याचा अर्थसंकल्प मांडला. हाही त्यांचा विक्रमच आहे. राज्याला आर्थिक शिस्त व पायाभूत सुविधा यावर भर देत सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी राज्याला आर्थिक प्रगतीकडे घेवून जाण्याचा प्रामाणिक प्रयत्न दादांनी केला. राज्यात सिंचनाचे जाळे विस्तारण्यासाठी अनेक सिंचन प्रकल्पाला त्यांनी गती दिली.

वक्तशीरपणा, स्पष्टवक्तेपणा, प्रशासकीय शिस्त, अहोरात्र काम व धडाडी वृत्ती तसेच प्रशासनावर वचक असणारे अजितदादा उमद्या स्वभावाचे व हजरजबाबी होते. यामुळे त्यांनी राज्याच्या राजकारणात आपला वेगळा ठसा उमटवला. भल्या पहाटेपासून कामाला लागणारे दादा मंत्रालयात नेहमी वेळेवर जाऊन कार्यालयातील फाईल व आलेल्या निवेदनांचा जलद निपटारा करत. ही दादांची खासियत होती. प्रशासकीय सुधारणेत तत्परता व तंत्रज्ञानाचा वापर त्यांनी सुरू केला. सहकार, शिक्षण, क्रीडा अशा विविध क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमटवला. राज्य ऑलंपिक तसेच खो-खो संघटनेचे अध्यक्ष पदही त्यांच्याकडे होते. शिवाय विद्या प्रतिष्ठानच्या माध्यमातून इंदापूर-बारामती या भागात एज्युकेशन हब बनवण्यात दादांचा मोठा वाटा राहिला आहे. पुणे जिल्हा सहकारी बँक व माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती त्यांनी घडवून आणली. तब्बल सोळा वर्ष ते जिल्हा सहकारी बँकेवर होते. कार्यकर्ते व सर्वसामान्यांची मोठी गर्दी नेहमी दादांच्या भोवती असायची. त्यांच्याकडे कोणीही काम घेऊन आले की दादा काम होणार असेल तर 'हो' म्हणायचे नसेल तर स्पष्टपणे 'नाही' म्हणायचे. होणारे काम पाठपुरावा करून पूर्ण करायचे. यामुळे त्यांची सर्वसामान्यांसह कार्यकर्त्यांशी नाळ जुळलेली होती. त्यांनी आपल्या कामातून आपली छाप राजकारण व समाजकारणावर टाकली. राजकारणात त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप झाले, कारभारावर टीका झाली, त्यांच्या आक्षेपार्ह विधानामुळे मोठे वादळ उठले. पण दादा डगमगले नाहीत. त्यांच्या राजकारणावर त्याचा फारसा परिणामही झाला नाही. पहाटेचा शपथविधी, राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये पडलेली फुट. यामुळे दादा राज्याच्या राजकारणात दीर्घकाळ चर्चेत राहिले. पक्षफुटी नंतर राष्ट्रवादीची धुरा त्यांनी मोठा संघर्ष करत समर्थपणे पेलली. नुकत्या झालेल्या नगरपालिका, नगरपंचायतीच्या निवडणुकीत त्यांनी आपला प्रभाव दाखवून दिला आहे. याच पद्धतीने जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या निवडणुकीत त्यांना यश मिळवायचे होते आणि त्या आधीच नियतीने आपला डाव साधला.

राज्याच्या राजकारणाच्या वर्तुळात नेहमी केंद्रस्थानी राहिलेले अजितदादा सुमारे साडेचार दशके राज्याच्या राजकारणात सक्रिय होते. महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. कामाच्या धडाडीतून दादांनी आदर्श निर्माण केला आहे. दादा किती मोठे होते हे त्यांच्या अंत्यविधीवेळी उसळलेल्या आणि हळहळलेल्या जनसागराने दाखवून दिले आहे.

राज्याच्या राजकारणातील, समाजकारणातील खऱ्या अर्थाने ते जननायक व लोकनेते होते. त्यांचा आदर्श समोर ठेवून दादाचे राज्याच्या विकासाचे स्वप्न आता पक्ष नेत्यांना, कार्यकर्त्यांना पूर्ण करायचे आहे. दरम्यान, गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीत सहभागी होऊन दादा व त्यांचा पक्ष सत्तेत सहभागी झाला. दादांना पुन्हा उपमुख्यमंत्री पद मिळाले. त्याबरोबर बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पदही त्यांच्याकडे आले. सर्व दृष्टीने मागास असलेल्या बीड जिल्ह्याला त्यांनी विकासाची पहाट दाखवली. पुढे 'जिल्ह्याची बारामती करून दाखवील व जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलेल!' हा शब्द त्यांनी पालकमंत्री म्हणून जिल्हाासियांना दिला. त्याप्रमाणे शेती, उद्योग, रोजगार, रस्ते, रेल्वे, पाणी, क्रीडा संकुल, तीर्थक्षेत्र विकास, पर्यटन व विविध विकास योजना तसेच विमानतळापर्यंतचा जिल्ह्याचा मास्टर प्लॅन त्यांनी तयार केला. त्यादृष्टीने कामाला त्यांनी सुरुवातही केली. परंतु त्यांच्या अकाली निधनाने जिल्ह्याच्या विकासाच्या स्वप्नाला खीळ बसली आहे. आता हे स्वप्न कोण पूर्ण करणार? हा प्रश्न बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांपुढे आहे. दादांच्या उत्तराधिकारी व त्यांच्या पत्नी सुनेत्राताई राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री झाल्या आहेत. राज्याच्या विकासाचे दादांनी दाखवलेले, बघितलेले स्वप्न आता ताईंना पूर्ण करावयाचे आहे. त्याचप्रमाणे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद ताईकडे येणार का? व जिल्ह्यात विकासाची गंगोत्री पुन्हा आणणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ****

# हुतात्मा दिन : सत्य, अहिंसा आणि राष्ट्राच्या आत्म्याला नमन


**भारताचा इतिहास हा केवळ राजे, युद्धे आणि सत्ता बदलांचा इतिहास नाही; तो विचारांचा, मूल्यांचा आणि बलिदानाचा इतिहास आहे. या इतिहासातील एक अत्यंत वेदनादायी, पण तितकाच प्रेरणादायी दिवस म्हणजे ३० जानेवारी हुतात्मा दिन. हा दिवस कोणत्याही उत्सवाचा नाही; तो अंतर्मुख होण्याचा, मौन पाळण्याचा आणि आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. कारण याच दिवशी, ३० जानेवारी १९४८ रोजी, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची निर्घृण हत्या झाली आणि भारताने आपला नैतिक आधारस्तंभ गमावला.**

हुतात्मा दिन म्हणजे देशासाठी प्राण अर्पण केलेल्या व्यक्तींना सामूहिक स्मरणाने वंदन करण्याचा दिवस आहे. हा दिवस केवळ एका व्यक्तीच्या मृत्यूचा नाही; तो सत्य, अहिंसा, सहिष्णुता आणि मानवतेच्या विचारांवर झालेल्या आघाताचा दिवस आहे. महात्मा गांधी यांचा मृत्यू म्हणजे शरीराचा अंत झाला; पण विचार अमर झाले अशी ऐतिहासिक साक्ष देणारी घटना आहे.

मोहनदास करमचंद गांधी हे नाव केवळ एका नेत्याचे नाही; ते जगण्याची पद्धत आहे. गांधीजींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी झाला, पण त्यांचा विचार आजही जिवंत आहे. त्यांनी भारताला स्वातंत्र्य दिले तेही तलवारीने नाही, बंदुकीने नाही, तर सत्य आणि अहिंसेने. डोळ्याला डोळा बदला दिला, तर संपूर्ण जग आंधळे होईल हा विचार केवळ उक्ती नव्हती; तो गांधीजींच्या संपूर्ण जीवनाचा पाया होता.

३० जानेवारी १९४८ रोजी संध्याकाळी प्रार्थनेस जात असताना नथुराम गोडसेने गांधीजींवर गोळ्या झाडल्या. त्या क्षणी केवळ एक व्यक्ती पडली नाही; तर धार्मिक सलोखा, मानवी करुणा आणि अहिंसेचा दीप क्षणभर डगमगला. पण इतिहास साक्ष देतो गोळी शरीराला भेदते; विचारांना नाही.

दरवर्षी ३० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता दोन मिनिटे मौन पाळले जाते. हे मौन कोणत्याही आदेशामुळे नसते; ते अंतःकरणातून उमटलेले श्रद्धांजलीचे स्वरूप असते. मौन म्हणजे शून्यता नव्हे; मौन म्हणजे विचारांची तीव्रता आहे. आजचा काळ



वेगवान, तणावपूर्ण आणि आक्रमक आहे. संवादाऐवजी वाद , सहमतीऐवजी संघर्ष, आणि विचाराऐवजी द्वेष वाढताना दिसतो. अशा काळात गांधीजी अधिकच आवश्यक वाटतात. गांधीजी म्हणाले होते तुम्हाला जगात जो बदल पाहायचा आहे, तो बदल स्वतः व्हा हा विचार आजच्या समाजासाठी दिशादर्शक ठरतो.

अनेकदा अहिंसेकडे कमजोरी म्हणून पाहिले जाते. पण इतिहास सांगतो अहिंसा ही सर्वात मोठी ताकद आहे. ब्रिटिश साम्राज्य तलवारीने कोसळले नाही; ते कोसळले नैतिक पराभवामुळे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत ३० जानेवारी हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्याबाबत स्पष्ट निर्देश दिलेले आहेत . सकाळी ११ वाजता दोन मिनिटे मौन पाळणे, शासकीय व निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये आणि नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेणे हा केवळ शासकीय कार्यक्रम नसून लोकशाहीतील नैतिक शिस्तीचा भाग आहे. बीड जिल्ह्यातही दरवर्षी हुतात्मा दिन अत्यंत शांततेत आणि गांभीर्याने पाळला जातो. जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालये, शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्था या सर्व स्तरांवर गांधीजींना श्रद्धांजली अर्पण करण्यात येते. बीडसारख्या ग्रामीण आणि संघर्षग्रस्त भागात गांधीजींचा सत्याचा आणि संयमाचा विचार अधिक उपयुक्त ठरतो. आजचा युवक सोशल मीडियावर सक्रिय आहे, पण वैचारिकदृष्ट्या अस्थिर होत चालला आहे. हुतात्मा दिन युवकांना एक प्रश्न विचारतो तुम्ही कोणत्या विचारांसाठी उभे आहात? केवळ हॅशटॅग नव्हे, तर मूल्ये जपणारा युवक घडवणे हीच खरी गांधीजींना आदरांजली ठरते.

भारतीय संविधान थेट गांधीजींनी लिहिले नाही; पण त्यांचा विचार प्रत्येक पानावर दिसतो. समानता, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय आणि मूलभूत अधिकार हे सारे गांधीविचारांचेच विस्तार आहेत.

आज गरज आहे संयमाची, संवादाची आणि सहिष्णुतेची. हुतात्मा दिन आपल्याला आठवण करून देतो देश चालतो तो केवळ कायद्याने नाही; तो चालतो मूल्यांवर. गांधीजी गेले, पण त्यांच्या पावलांचे ठसे अजूनही रस्त्यांवर आहेत . सत्य अजूनही बोलते, अहिंसा अजूनही मार्ग दाखवते, आणि हुतात्मा दिन अजूनही आपल्याला विचार करायला लावतो. जिथे माणुसकी जिवंत असते, तिथे गांधी कधीच मरत नाहीत. हुतात्मा दिन म्हणजे शोकाचा दिवस नाही; तो संकल्पाचा दिवस आहे द्वेष न करण्याचा, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा, आणि सत्याशी तडजोड न करण्याचा. हुतात्मा दिन हा केवळ दिनदर्शिकेतील दिवस नसून तो राष्ट्राच्या अंतःकरणात कोरलेला क्षण आहे.

**-चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
तहसीलदार, बीड

'**परळी परिसर**' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.LSB/BEED/RNP-265 / 2026-2028** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**
* वर्ष ०९ * अंक ३९ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. ०२ फेब्रुवारी २०२६ * किंमत : २ रू.

# आत्मसन्मान वाढवणारा नेता

**अजितदादांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धगधगतं पर्व संपलं आहे. प्रशासनावर मजबूत पकड असलेला, कडक शिस्तीचा हा नेता आतून किती हळवा आणि माणुसकी जपणारा होता, याचा प्रत्यय आम्हाला २०१२ साली आला. त्यावेळी आम्ही आमदारांचे स्वीय सहाय्यक (PA) म्हणून नुकतेच रुजू झालो होतो. केवळ ७,८२५ रुपये इतक्या तुटपुंज्या मानधनावर घर चालवणं अवघड होतं. पगारवाढीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. ही फाईल जेव्हा अजित दादांकडे आली, तेव्हा त्यांनी**



**जे केलं, ते केवळ दादाच करू शकतात!**

विधिमंडळाच्या लॉबीमध्ये सचिवांनी अवघ्या २ ते २.५ हजार रुपयांच्या वाढीचा प्रस्ताव मांडला होता. तो प्रस्ताव ऐकताच दादा त्यांच्या खास शैलीत कडाडले. अरे, १० हजारात काय होतं? ही पोरं कुठे जाणार? थेट १५ हजारांचा प्रस्ताव द्या! एका क्षणात आमचा पगार दुप्पट झाला. पण त्याहून मोठी गोष्ट म्हणजे, त्या निर्णयाने आम्हाला जगण्याचा आत्मविश्वास आणि कामाचा आत्मसन्मान मिळाला.

दादांचं दातृत्व इथेच थांबलं नाही. फडणवीस सरकारच्या काळात सुधीर भाऊ मुनगंटीवार यांनी वेतन २५ हजार रुपये केलं. महाविकास आघाडी सरकारमध्ये दादांनी पुन्हा पुढाकार घेत हे वेतन ३० हजार रुपये केलं. आणि विशेष म्हणजे, मागील वर्षी अर्थसंकल्पात हे वेतन ४० हजार रुपये करण्याचा त्यांचा ठाम मानस होता. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्या होत्या. यावर्षी ते नक्कीच प्रत्यक्षात उतरलं असतं कारण ते शब्दांचे पक्के दादा होते. पण नियतीला काही वेगळंच मान्य होतं. या निर्णयाची अंमलबजावणी होण्याआधीच काळाने त्यांना आमच्यातून हिरावून नेलं. सामान्य माणसाच्या पोटाचा विचार करणारा, पदापेक्षा माणूस मोठा मानणारा असा नेता पुन्हा होणं कठीण आहे. भावपूर्ण श्रद्धांजली दादा. तुमचे उपकार आमची पिढी कधीच विसरणार नाही.

***हज़ारों साल नर्गिस अपनी***
***बे-नूरी पे रोती है,***
***बड़ी मुश्किल से होता है चमन***
***में दीदा-वर पैदा।***

(हजारो वर्षे निसर्ग वाट पाहतो, तेव्हा कुठे एखादा असा कर्तृत्ववान माणूस जन्माला येतो.)

**– प्रशांत जोशी**
स्वीय सहायक, आ.धनंजय मुंडे
परळी वैजनाथ.

# जनतेच्या हृदयात कायम जिवंत असलेले नेतृत्व : लाडक्या बहिणींचे दादा

**२८ जानेवारी २०२६ हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रासाठी, विशेषतः महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींसाठी अत्यंत दुःखद आणि काळा दिवस ठरला. जनतेच्या सुख-दुःखात सदैव सहभागी असणारे, सर्वसामान्य माणसासाठी रात्रंदिवस झटणारे लाडक्या वहिनींचे लाडके नेते अजित दादा आज आपल्यामध्ये नाहीत, ही भावना मनाला चटका लावणारी आहे.**




अजित दादा हे केवळ एक राजकारणी नव्हते, तर ते जनतेतून आलेले, जनतेसाठी जगलेले नेतृत्व होते. लोकांच्या समस्या स्वतःच्या समस्या समजून त्या सोडवण्यासाठी ते कायम तत्पर असायचे. सत्ता, पद किंवा प्रतिष्ठेपेक्षा माणूस आणि माणुसकी यांना त्यांनी नेहमीच अग्रक्रम दिला. त्यामुळेच ते लाखो लोकांच्या मनात आपली अढळ जागा निर्माण करू शकले.

२ ऑक्टोबर २०२४ रोजी परळी येथे झालेल्या अजित दादांच्या जनसन्मान यात्रेचा प्रसंग अनेकांसाठी आयुष्यभराची आठवण ठरला. मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण' योजनेतून अक्षरा अक्षय शिंदे यांनी छोटासा वटवृक्ष झाडांचा व्यवसाय सुरू केला होता. धनंजय मुंडे साहेबांनी त्या व्यवसायाची माहिती अजित दादांना दिली आणि त्यांच्या हस्ते अक्षरा यांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी अजित दादांनी केलेले मनापासून कौतुक, असेच पुढे जा असे दिलेले प्रोत्साहन आणि आशीर्वादरूपाने दिलेली प्रेरणा आत्मविश्वास वाढवणारी होती.

अजित दादांसारखे नेते पुन्हा होणे कठीण आहे. नेते अनेक असतात, परंतु जनतेच्या मनात घर करणारे, विश्वास निर्माण करणारे आणि आयुष्यभर लक्षात राहणारे नेते विरळाच. आज अजित दादा आपल्यात नसले, तरी त्यांचे कार्य, त्यांची मूल्ये आणि जनतेसाठीची तळमळ कायम स्मरणात राहील. महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात त्यांनी कोरलेली छाप कधीही पुसली जाणार नाही. अजित दादा हे नाव केवळ आठवण म्हणून नव्हे, तर प्रेरणादायी विचार म्हणून कायम जिवंत राहील. लाडकी बहिण अक्षरा अक्षय शिंदे व परिवाराच्या वतीने लाडके कर्तृत्वान लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली.!

**लाडकी बहिण**
**अक्षरा अक्षय शिंदे**
**परळी वैजनाथ**

# परळीवर बारामती प्रमाणे प्रेम करणारे नेतृत्व : अजितदादा पवार

आमच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार साहेब यांच्या श्रद्धांजलीपर सर्वपक्षीय शोकसभा परळी वैजनाथ नगरीमध्ये आज आयोजित करण्यात आली. यावेळी सभेसमोर अत्यंत वेदनादायी मनाने शोकप्रस्ताव सादर केला. निष्काम कर्मयोगी, कर्तव्यपरायण व निःस्वार्थ लोकसेवक राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा यांच्या जाण्याने महाराष्ट्राने एक कर्मनिष्ठ नेतृत्व गमावले आहे. परळी वैद्यनाथ नगरीचे आणि दादांचे नाते तसे जुनेच; मात्र आ. धनंजयजी मुंडे साहेबांमुळे अधिक दृढ झाले. सन २००९ मध्ये विधान परिषद निवडणुकीत विधानसभेतील आमदार सदस्यांचे कमी पडणारे मतदान स्व. दादांनी मिळवून दिले आणि धनुभाऊंचा आणि दादांचा ऋणानुबंध सुरू झाला. तद्नंतर नगर परिषद निवडणूक २०११ मध्ये आम्ही १२ सदस्यांनी अधिकृत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला आणि दादांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी परिवारात आमचा प्रवास सुरू झाला. अन् दादांनी वैद्यनाथ नगरीला 'सुवर्णजयंती नगरोत्थान महाजलअभियान' या योजनेतून पहिली सुधारित पाणीपुरवठा योजना भेट दिली.

२०१४ साली राष्ट्रवादी आणि काँग्रेस पार्टी महाआघाडीचे सरकार राज्यातून गेले आणि महायुतीची सत्ता आली. एक प्रतिकूल परिस्थिती आणि संघर्षाचा काळ सुरू झाला होता.२०१४ ते २०१७ या २.५ वर्षांच्या काळात परळी-वै. नगरीचा नगराध्यक्ष म्हणून धनुभाऊ आणि स्व. दादांनी माझ्यासारख्या अत्यल्पसंख्याक समाजातील एका युवक कार्यकर्त्याला जबाबदारी दिली. त्यावेळी मराठवाड्यातील तरुण नगराध्यक्षांपैकी मी एक होतो.तात्कालीन विरोधी पक्षातील नेता म्हणून विधिमंडळ गटनेतेपदी आदरणीय दादांनी जबाबदारी स्वीकारली आणि विरोधी पक्षनेतेपद आपले लढवय्ये नेते आ. धनंजयजी मुंडे साहेब यांना देऊन परळीकरांचा सन्मान पहिल्यांदा राज्यात वाढवला. आदरणीय आ. धनंजय मुंडे साहेबांनी देखील आपल्या 'मुंडे बाण्यातून आणि संघर्षाच्या वारशातून' महाराष्ट्र राज्यात चांदा ते बांदा लोकप्रियता आणि लोकसंचय निर्माण करून सक्षम विरोधी पक्षनेते म्हणून राज्याचे शिर्षस्थ नेते म्हणून उदयास आले, ते स्व. दादांच्या धनुभाऊ यांच्यावरील प्रेम आणि विश्वासामुळे.पुढे त्यांना कृषी मंत्री, सामाजिक न्याय मंत्री,



अन्न व नागरी पुरवठा मंत्री अशी तीनवेळा मंत्रिमंडळात संधी देऊन तसेच पक्ष प्रवक्ता, स्टार प्रचारक या महत्त्वपूर्ण संघटनात्मक जबाबदाऱ्या सातत्याने देत राहिले.स्व. दादांसमवेतच्या अनेक आठवणी माझ्या आहेत. परळीत लोकनेते गोपीनाथ मुंडे नटराज रंगमंदिर, डॉ. भालचंद्र वाचनालय इमारत भूमिपूजन, नगरपालिकेची प्रशासकीय इमारत लोकार्पण यांसह अनेक विकास कामांच्या सोहळ्यांत दादा परळीत आले असता एका दिग्गज नेत्याने नगराध्यक्षाचा सन्मान कसा करावा, हे लक्षवेधी होते.

कुठलीही फीत कापताना, श्रीफळ वाढवताना अध्यक्ष कुठे आहेत? असे सातत्याने ते विचारणा करायचे. तसेच न.प.च्या जी.बी. हॉलमध्ये प्रेस कॉन्फरन्समध्ये डायसवर मला बाजूला बसवून घेतले होते. हा क्षण कधीच मी विसरू शकणार नाही...
तेव्हा एकदा परळीत कार्यक्रम करून दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच वैद्यनाथांचे दर्शन घेऊन नांदेडला निघाले असता छत्रपती संभाजी महाराज चौक येथील हायमास्ट प्रज्वलित होता. धनुभाऊ सोबतच होते. साहेब माझी पाठराखण करत होते, मात्र दादांनी ऐकून न घेता नगराध्यक्षाला फोन लावा म्हणून निर्देश देत मला चांगलेच झापले होते. अजूनही तो क्षण आठवला तर थरकाप होतो.आ. धनंजय मुंडे साहेबांसोबत अनेक वेळा दिवाळी पाडवा निमित्ताने बारामतीमध्ये दादांना भेटायला जायचो. एका वर्षी शहराध्यक्ष म्हणून पाच वर्षांचा अहवाल 'ओंजळ'चे प्रकाशन दादांच्या हस्ते करण्यात आले. दादा बिमार असतानाही काटेवाडी येथील निवासस्थानी आम्हाला भेटायला हॉलमध्ये आले होते. त्यावर्षी तब्येत चांगली नसल्याने महाराष्ट्रातून आलेल्या लाखो कार्यकर्त्यांना दादांची भेट होऊ शकली नाही, मात्र ते बीड जिल्ह्यातील आणि परळीतील सहकाऱ्यांना भेटले. इतके दादा आपल्या जिल्ह्यावर आणि परळीवर प्रेम करायचे.मुंबईमध्ये पक्षाच्या आढावा बैठकीत अनेकदा दादांची भेट व्हायची. एकदा तर योगायोगाने माझ्या वाढदिवसाच्या दिवशी प्रदेश कार्यालयात दादांची सर्व प्रदेशाध्यक्षांसोबत बैठक होती. तितक्या कार्यबाहुल्यातून दादांनी सर्वसमक्ष मला बुके देऊन शुभेच्छा दिल्या. तो अविस्मरणीय क्षण मी कधीच विसरू शकत नाही.परळीच्या प्रत्येक सभेत दादा त्यांच्या भाषणाच्या अगोदर त्यांच्या आणि आ. मुंडे साहेबांच्या स्वीय सहाय्यकाकडून पदाधिकाऱ्यांची नावे भाषणात नामोल्लेख करण्यासाठी यादी घ्यायचे आणि मागे बसलेला मी, माझ्याकडून शहराध्यक्ष म्हणून कोणी प्रमुख पदाधिकारी यादीत विसरला तर नाही ना, ही खात्री करून घ्यायचे.

दादांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून अनेक महत्त्वपूर्ण विकास कामे हाती घेतली होती. त्यात जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींसाठी २०० कोटींचे कौशल्य निर्माण करणारे 'इनोव्हेशन सेंटर', विमानतळ, तारामंडळ, महत्त्वाचे रस्ते, पाणीपुरवठा योजना, स्व. यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाचे नूतनीकरण यांसह अनेक महत्त्वाकांक्षी विकास कामांना मंजुरी दिली होती, ज्यामुळे आपल्या जिल्ह्याचा बीड नगरीचा रूप पालटणार आहे.परळी वैद्यनाथ नगरीवर दादांचे बारामतीसारखेच प्रेम जडले होते. वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास योजना, कृषी महाविद्यालय, पशुपालन महाविद्यालय या परळी नगरीचे अवघे रूप बदलणाऱ्या योजना मंजूर केल्या.नियती कसा खेळ करते, बघा. २७ तारखेला आ. धनंजय मुंडे साहेबांचा फोन आला की येणाऱ्या राज्य अर्थसंकल्पीय अधिवेशनात परळी शहरातील उर्वरित महत्त्वाची कामे प्रस्तावित करायची असून तुम्ही सर्व प्रस्ताव घेऊन मुंबईला या. मी दादांचा २९ जानेवारीचा वेळ परळी नगर परिषदेसाठी घेतला आहे.काळाने ही भेटच होऊ दिली नाही.नगर परिषद निवडणूक विजयानंतर ही पहिलीच भेट; अन् दादांची भेटल्यानंतर पहिलीच प्रतिक्रिया पाहू शकलो नाही, हे आयुष्यभर शल्य मनात राहील.

**– बाजीराव धर्माधिकारी,**
माजी नगराध्यक्ष-परळी वैजनाथ.